# प्रेस नोट दि.१०/१०/२०२४

## मा. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांचे अथक प्रयत्नांना अखेर यश

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड, पोलीस भरती मैदान व इतर अनुषंगिक कार्यालयांसाठी शासनाने मंजुर केली वळुमाता प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे येथील २० हेक्टर मोकळी जागा**

------ooo------

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना महाराष्ट्र शासन निर्णयानुसार दि.२८/५/२०१८ अन्वये झालेली आहे. परंतु आयुक्तालय स्थापनेस सुमारे ६ वर्षे होवुन देखील पिंपरी चिंचवड आयुक्त कार्यालय, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचेकरिता निवासस्थाने, पोलीस विभागाचे मुख्यालय व इतर अनुषंगीक कार्यालये यांना स्वतंत्र जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रशासकिय कामकाज करणे व कामकाज सुरळीतपणे चालविण्यामध्ये खुप मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण होत होत्या. तरी मा.विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी डिसेंबर २०२२ मध्ये पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर सदर बाब विचारात घेवुन आयुक्तालयासाठी सदरच्या अत्यावश्यक असणाऱ्या जागा प्राप्त करण्याचा निर्णय घेवुन त्याचा व्यक्तिशः पाठपुरावा सुरु केला.

सदर पाठपुराव्यामुळे ९ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयासाठी मौजे चिखली, ता.हवेली गट नं.५३९ येथे सुमारे ३.३९ हेक्टर जागा मंजुर केली व दि.२३/९/२०२४ रोजी सदर जागेचा ताबा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त आस्थापनेस मिळाला आहे. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे निवासस्थान व पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ यांचे कार्यालय तसेच इतर अनुषंगीक कार्यालयांसाठी जागा मिळणेसाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाने वाकड डिस्ट्रीक्ट सेंटर, काळेवाडी कस्पटे वस्ती रोड येथील स.नं.२०८ मधील पीएमआरडीए, पुणे यांचेकडील सुमारे १५ एकर जागा मंजुर केली आहे.

परंतु कोणत्याही पोलीस आयुक्तालयासाठी अत्यावश्यक असणारी मुख्यालय, शस्त्रागार, परेड ग्राऊंड, पोलीस भरती मैदान व इतर अनुषंगीक कार्यालयांसाठी जागा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयास उपलब्ध नसल्याने पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निगडी येथील बोऱ्हाडे शाळेच्या भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहे.

यासाठी मागील सुमारे ४ वर्षापासुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडुन विविध शासकिय विभागांकडे पोलीस मुख्यालयाकरिता जागा उपलब्ध होणेसाठी पाठपुरावा करण्यात येत होता. परंतु अद्यापपर्यंत पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालयाकरिता जागा उपलब्ध झालेली नव्हती. त्याकरिता मा.पोलीस आयुक्त यांनी डिसेंबर २०२२ मध्ये कार्यभार हाती घेतल्यानंतर मागील सुमारे २ वर्षांपासुन शासनाकडे वैयक्तिकरित्या पाठपुरावा केला. त्यानुसार पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालयाकरिता महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाचे वळुमाता प्रक्षेत्र, ताथवडे यांचेकडे सद्यस्थितीत मोकळया असणाऱ्या एकुण ६७.९४ हेक्टर जागेपैकी २० हेक्टर जागा पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे मुख्यालयाकरीता मिळाल्यास नागरिकांना दळवणवळणाचे व संपर्काचे दृष्टीने सोयीचे होईल व प्रशासकीय दृष्टीने पोलीस आयुक्तालयाचा कारभार चालवण्यासाठी सुध्दा सदर परिसर उपयुक्त ठरणार असल्याने मा.पोलीस आयुक्त यांनी मा.देवेंद्र फडणवीस सो., गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री व मा.अजित पवार सो., पालकमंत्री, पुणे जिल्हा तथा उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर जागेबाबत व्यक्तीशः पाठपुरावा केला. त्यानुसार माननीयांनी तात्काळ सदर बाबत संबंधितांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आदेश देवुन आज दि.१०/१०/२०२४ रोजी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये सदर जागा पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे मुख्यालयास देण्यासाठी मान्यता दिली आहे.

तरी सदर जागेमध्ये पोलीस मुख्यालयाकरिता पुढील प्रमाणे कार्यालये निर्माण करता येणे शक्य होईल -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **पोलीस उप आयुक्त मुख्यालय यांचे कार्यालय** | २ | **पोलीस परेड ग्राऊंड** |
| ३ | **पोलीस भरती मैदान** | ४ | **श्वान पथक** |
| ५ | **मोटार परिवहन विभाग** | ६ | **क्युआरटी करिता कार्यालय** |
| ७ | **पोलीस शस्त्रागार** | ८ | **पोलीस दवाखाना** |
| ९ | **रनिंग ट्रॅक व इतर आवश्यक क्रीडा सरावाची मैदाने** | १० | **बीडीडीएस इमारत** |
| ११ | **पोलीस पाल्यांकरिता शाळा** | १२ | **इंटरनल शुटींग रेंज** |
| १३ | **पोलीस वसाहत** | १४ | **बहुद्देशीय हॉल** |
| १५ | **बंदोबस्ताकरिता येणारे अधिकारी व अंमलदार यांचेसाठी निवासस्थाने** | १६ | **इतर अनुषंगीक कार्यालये** |

याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने दिलेल्या मंजुरीमुळे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची सुमारे ६ वर्षांची प्रतिक्षा अखेर संपली असुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मुख्यालयासाठी स्वतःचे मालकीची जागा उपलब्ध होणार आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड चे मा.पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस सह आयुक्त डॉ.शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त मुख्यालय, श्रीमती माधुरी केदार-कांगणे व पोलीस उप आयुक्त, परि-III, श्री.डॉ.शिवाजी पवार व पोलीस निरीक्षक श्री. विकास राऊत यांनी वैयक्तिकरित्या मंत्रालय येथे संबंधितांशी वेळोवेळी पाठपुरावा करुन केली आहे.

**( डॉ.शिवाजी पवार )**
पोलीस उप आयुक्त, परि- III,
पिंपरी चिंचवड.